# WOMEN'S STATUS IN INDIAN SOCIETY



• EDITOR •

Dr. Vandana Bankar

• C0- EDITOR •

Pratibha Agharde

NCIWOC ISBN 978-93-88158-03-9

# ५५. महिलासक्षमीकरणात राष्ट्रीय महिला आयोगाचे योगदान - एक समाजशास्त्रीय अध्ययन

**डॉ.दत्ता मा. तंगलवाड**

सहाय्यक प्राध्यापक आणि समाजशास्त्र विभाग प्रमुख कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर (गढी), ता.गेवराई, जि.बीड

**प्रस्तावना :-**

इतिहासाचे अवलोकन केले असता प्राचीन कालखंडातील स्त्रीहीसुरक्षित स्वावलंबी व सक्षम होती.प्रतिष्ठा व मानसन्मानाचे स्थान महिलांना समाजात दिले जात होते.ऐतिहासिक ग्रंथामधील पुरावे पाहिले असता एक विशेष बाब लक्षात येतेती म्हणजे राजकुमारीचे लग्न तिच्या आवडीच्या मुलाशीहोत असत.सर्व प्रकारचे निर्णय घेण्याचे मुक्त स्वातंत्र्य होते. पण उत्तर वैदकि कालखंडापासूनस्त्री जीवनाला दास्य प्राप्त झाले आहे आणि काळाच्या ओघात दिवसेंदिवस स्त्री जीवन वंदिस्तहोत गेले व चुल आणि मुल एवढेच स्त्रीचे कार्यक्षेत्र बनले. स्त्रीयांवर होणाऱ्या अन्याय अत्याचारा विरोधात आवाज उठवण्याचे काम राजाराम मोहन रॉय, महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, शाहु महाराजयांनी केले.बाबासाहेबांनी त्याला संविधानीक रुप प्राप्त करुन देण्याचे काम केलेतरीही आज दिवसागणीक स्त्रीवर होणारे अन्याय, अत्यचार हे दिवसेंदिवस वाढताना दिसुन येतात. भारतीय संविधानात स्त्रीसंरक्षण विषयक विविध कलमांचीतरतुद असुन देखील खुन, बलात्कार, छेडछाडीचे प्रमाण वाढले आहे. त्याची तिव्रता देखील दिवसेंदिवस वाढत आहे. पुरुषांकडुन स्त्रीवर होणारे अन्याय, स्त्रीकडून स्त्रीवर होणारे अन्याय व त्याचे वाढते प्रमाण पाहिले असता स्त्री जन्मा हीतुझी कहाणी ऱ्हदय अमृत नयनी पाणी असे सहज ओठातून शब्द बाहेर पडतात.शासनाने महिलांच्या विकासासाठी विविध योजना, आयोगतसेच भारतीय संविधानात कायद्याद्वारेसंरक्षण देण्याचे काम केले.

महिलांची उत्तर वैदिक कालापासून आजपर्यंत होत असलेली सामाजिक, आर्थिक, राजकीय फरपट थांबवण्यासाठी १९८० नंतर विशेष पावले उचलण्यात आली.स्त्री-पुरुष समानेवर विशेष भर देण्यात आला.त्यातूनच १९९० मध्ये महिला सक्षमीकरणाच्या संकल्पनेचा उदय झाला ही केवळ संकल्पनाच नसून प्रक्रिया व चळवळ म्हणून सक्षमीकरणाकडे पाहिले जावू लागले.लिंगभेदावर आधारीत विषमता नष्ट करुन विकासाच्या प्रक्रियेत पुरुषाच्या बरोबरीने महिलांना समान संधीचे समर्थन करणारीही एक आंतरराष्ट्रीय चळवळ आहे.कोणत्याही राष्ट्राचा विकास स्त्री-पुरुषाच्या विकासावर अवलंबून असतो म्हणून महिलाच्यासक्षमीकरणासाठी शासकिय पातळीवर शासनान अनेक विकास योजना आखल्या.

**महिला सक्षमीकरणाचा अर्थ :-**

महिलांना शारीरिक व मानसिक दृष्टीनेसदृढ बनविण्या बरोबर महिलावर होणाऱ्या सामाजिक व आर्थिक, राजकीय, शैक्षणिक दृष्टीने होणाऱ्या अन्यायावर मात करणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय. म्हणजेच अबला महिलांना सबल करण्यासाठी समान संधी देणे होय असे प्रतिपादन पाबलो फिरे यांनी केले.

थोडक्यात म्हणजे आजच्या जागतिकीकरणाच्या काळात भारतीय महिलांना अबलाची सबला बनून स्वतःच्या पायावर भक्कमपणे उभे करण्याची प्रक्रिया म्हणजे सक्षमीकरण होय. यासाठी महिलांना समान संधी देण्यासाठी महिलावर होणारे अन्याय दुर करण्यासाठी राष्ट्रीय व राज्यपातळीवर महिला आयोगाची स्थापना करण्यात आली.

कोणत्याही देशाचा विकास व देशात विकसीत होणाऱ्या व वापरल्या जाणाऱ्या तंत्रज्ञान व विज्ञानावर अवलंबुन नसते तरते तंत्रज्ञान स्त्रियांना वापरण्याची समान संधी देण्याच्या मानसिकेतवर अवलंबुन आहे. ज्या देशात महिलावर पुरुषांचे वर्चस्व कमीआहे, त्या देशातील महिला विकासाबरोबर राष्ट्राचा विकास घडुन येतो.युरोप, अमेरिका, जपान, जर्मनीच्या तुलनेत भारत, पाकिस्तान, अरबी देशाचा विकास झालेला दिसुन येत नाही. कारण प्रगत देशात स्त्रीया पुरुषांबरोबरच समान संधी दिली जाते.प्रथा परंपरांच्या नावावर काही देशात महिलांना दडपुन ठेवले तर काही देशांत मुक्त स्वातंत्र्य दिले. परिणामी ज्ञानाच्या माध्यमातून स्त्रीने अनेक क्षेत्रात पदार्पण केले आहे म्हणुनच इंदिरा गांधी, सरोजिनी नायडु, लता मंगेशकर, कल्पना चावला, सुनिता विल्यम्स्, पी.टी.ऊषा, कर्नम मल्लेश्वरी या सारख्या महिला अजरामर झाल्या असे असले तरी सर्वसामान्य स्त्रीयांच्या जीवनात अजुनही आशोचा किरण सापडलेला नाही. क्षणोक्षणी महिलांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. महिलांना समाजात सन्मान मिळावा म्हणुन भारत सरकारने अधिनियम १९९० उपकलम २० अन्वये जानेवारी १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली असुन या आयोगाचे महिलांच्या सक्षमीकरणात काय योगदान आहे याचा आढावा घेण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोधनिंबंधात घेण्यात आला आहे.

**माहितीचे विश्लेषण :-**

राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना ही महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी करण्यात आली असुन पहिला अध्यक्षा जयंती पटनायक या होत्या मध्या ललिता कुमार मंगलम या

आयोगाच्या अध्यक्षा आहेत. यापुर्वी वी मोहिनी गिरी, विमा पार्थ सारथी, डॉ. पुर्णीमा अडवाणी, डॉ.गिरीजा व्यास, ममता शर्मा, या आजपर्यंत हावेनु गेलेल्या अध्यक्षा आहेत.विशेष म्हणजे १९९१ त २०१८ या कालावधीत महिलांना आयोगाचे अध्यक्ष करण्याचे आले.पुरुषप्रधान समान व्यवस्थेत स्त्रीयांना पद मिळणे म्हणजे समान संधीच्या दृष्टीने उचललेले पहिले पाऊल आहे.महिला आयोगाच्या अध्यक्षा महिलाच असल्या पाहिजेत सुद्धा या देशातील पुरुषी मानसिकतेच्या मोठेपणा मानला पाहिजे.

**संशोधन विधान :-** "महिला सक्षमीकरणात राष्ट्रीय महिला आयोगाचे योगदान - एक समाजशास्त्रीय अध्ययन"

**संशोधनाची गृहितके :-**

१. राष्ट्रीय महिला आयोग महिलांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतो.
२. महिलांशी संबंधीत कायदे, घटनादुरुस्तीद्वारे करण्यासाठी शासनाला सल्ला देण्याचे अंमलबजावणीवर लक्ष ठेवण्याचे काम राष्ट्रीय महिला आयोग करतो.
३. भारतीय संविधान व कायदे प्रणालीच्या आधारे महिलांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारशी सुचवून महिलांच्या तक्रारीचे निवारण करणेचे आयोगात योगदान आहे.
४. स्त्रीयांना माणुस म्हणून जगण्यासाठी राष्ट्रीय महिला आयोगाने योगदान दिले.
५. सामान्य स्त्री, दलीत, ग्रामीण, अदिवासी माणसांपर्यंत पोहचण्यात आयोगाला अपयश आले.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. राष्ट्रीय महिला आयोगाच्या कार्याचा आढावा घेणे.
२. महिला सक्षमीकरणासाठी आयोगाच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**नमूना निवड :-**

राष्ट्रीय महिला आयोगाच्या महिला सक्षमीकरणातील योगदानाचा, अभ्यास करण्यासाठीसहेतुक नमुना निवड तंत्राची निवड केली असुन महिला सक्षमीकरणासाठी आयोगाने केलेल्या विविध कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

**तथ्य संकलनाचीसाधने :-**

प्रस्तुत शोध निबंध लेखणासाठी माहिती सर्वेक्षण तंत्राचा अवलंब करण्यात आला असुन त्या विविध संदर्भ ग्रंथ करण्यात आला असुन विविध संदर्भ ग्रंथ वर्तमानपत्र व Internet चा अवलंब करण्यात आला.

**संशोधनाचे कार्यक्षेत्र :-**

राष्ट्रीय महिला आयोगाचे स्त्रीसक्षमीकरणातील योगदानही संशोधनाची क्षेत्रमर्यादा आहे.

**महिला आयोगाचे कार्ये :-**

१. भारतीय संविधान व कायदे प्रणालीत महिलांच्या हितसंबंधाचे संवर्धन करण्यासाठी पुरवण्यात आलेल्या सर्व बाबींचा तपास व परिक्षण करुन केंद्र शासनाला अहवाल सादर करणे.
२. महिलाची सामाजिक स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी उपाययोजना सुचवणे.
३. महिलांच्यातक्रारी निवारणासाठी, कायदेशीर उपाययोजना सुचविणे.
४. महिला विषयक तरतुदीचे कायदेप्रणालीद्वारे उल्लंघन झाल्यास संबंधीत प्रकरणासंबंधी केंद्रसरकारला कळविणे.
५. महिलांच्या बाबतीत केला जाणारा भेदभाव आणि त्यांच्यावर केली जाणारी हिंसा या संदर्भातील प्रकरणाची सखोल चौकशी व विशेष अभ्यास करणे.
६. केंद्र व राज्य सरकारच्या महिला विकास कार्याचे मुल्यमापन करणे.
७. कैदी महिलांना स्थानबद्ध केलेल्या ठिकाणांनी भेटी देवून आवश्यकता वाटल्यास तेथील परिस्थिती सुधारणा घडवुन आणण्यासाठी शिफारशी सुचविणे.
८. विशेष गंभीर प्रकरणात आयोगाद्वारे स्वतंत्र समित्या नेमण्यासाठी शिफारशी करणे.
९. महिलांशी संबंधीत न्यायालयीन प्रकरणात पाठपुरावा करणे.
१०. महिलांशी संबंधीत विविध समस्यांची वाढती तीव्रता त्यांचे स्वरुप या बाबत शासनाला अहवाल सादर करणे.

उपरोक्त स्वरुपाची कार्य राष्ट्रीय महिला आयोगानी करावेत अशी सर्वसामान्य महिलांची अपेक्षा आहे. या अनुषंगाने विविध विचारवंतानी मांडलेले विचार स्त्री अभ्यासकांची मते व सामान्य महिलांची मते यांचे अवलोकन केले असता राष्ट्रीय महिला आयोगाच्या कार्यात अनेक त्रुटी असल्याचे दिसुन येते. वास्तवकि पाहता पुरुषाकडुन होणारा अन्याय दुर करण्यासाठी आयोगाची स्थापना झालेली असलीतरी आयोगाकडुन विविध कार्याची अंमलबजावणी व्यवस्थीत होताना दिसत नाही.आपल्यावर होणाऱ्या अन्याया विरोधात दाद मागण्याची महिलांची संख्या जरी वाढत असलीतरीहे प्रमाण शहरी भागातील सुशिक्षीत महिलांमध्ये असलेले दिसुन येते.त्या प्रमाणात ग्रामीण भागातील तक्रारी करणाऱ्या महिलांचे प्रमाण खूपच कमी आहे. एवढेच नव्हे तर बऱ्याच महिला अन्याय सहन करतात पण न्याय मागण्यास कोठेही जात नाहीतही वास्तविकता आहे व या संदर्भात जनजागृती करण्यासाठी आयोगाकडून कसलीही भूमिका बजावत असल्याचे दिसुन येत नाही.केवळ कागदावरच कार्यवाही न करता प्रत्यक्ष कार्यवाहीची आवश्यकता आहे.

**निष्कर्ष :-**

१. विशाल दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून स्थापन केलेला राष्ट्रीय महिला आयोग महिला सबलीकरणासाठी महत्वाची भूमिका बजावतो आहे असे वाटत असलेतरी सामान्य पर्यंत आयोग पोहचला नाही.
२. अनेक वेळा गंभीर प्रकरणात आयोगाची बघ्याची भूमिका निदर्शनास येते.
३. आयोगाशी संबंधीत सर्व सदस्यांनी आपला कामकाजात वस्तूनिष्ठ दृष्टीकोन ठेवणे गरजेचे आहे पण तसेहोताना दिसत नाही.

४. गुन्हेगाराला शिक्षा करण्यासाठी आयोगाकडून कठोर पावले उचलले जात नाही.

५. अबला बलात्कार पिडीत महिलांचे पुर्नवसन करण्यासाठी महत्वपुर्ण भूमिका बजावल्यामुळे भारतीय संसदेत मान्यता मिळून कायद्यात रुपांतर होण्याच्या वाटेवर आहे.

६. काही गंभीर प्रकरणात राष्ट्रीय महिला आयोग राज्य महिला आयोगावर जबाबदारी सोडून अलिप्त राहण्याची भूमिक बजावतो.

७. एखाद्या घटनेवर प्रतिक्रिया देवून चालत नाहीतर कठोर कार्यवाहीची पावले उचलणे गरजेचे असते. उदा.आरुषी हत्यांकाडातील आयोगाची भूमिका, खुपच उदासिन दिसून येते.

८. आयोगाकडेतक्रारी घेवुन जाणाऱ्या महिलांचे प्रमाण खुपच कमी आहे. परिणामी आयोग त्यांच्यापर्यंत पोहचत नाही.

**शिफारशी :-**

१. राष्ट्रीय महिला आयोगाने सामान्य माणसापर्यंत पोहचण्यासाठी विशेष मोहीम (योजना) आखावी.

२. महिलांवरील होणारे अत्याचार रोखण्यासाठी विविध चित्रपटातील अश्लील दृश्यावर बंधन घालण्यासाठी विशेष धोरण आखण्याचीसरकारची शिफारस करावी व धोरणात्मक निर्णय घेण्यास भाग पाडावे.

३. ग्रामीण भागातील महिलांना सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देवून समान संधी देण्यासाठी विशेष उपक्रम राबवण्यासाठी शिफारस आयोगामार्फत शासनाला करावी.

४. गुन्हेगारांना शिक्षा व कठोर कार्यवाहीसाठी आयोगाने कठोर पावले उचलणे आवश्यक आहे.

## संदर्भ


१. डॉ. अनिल कठोर (२०१३) भारतीय स्त्री चहवळीचा इतिहास, एज्युकेशनल पब्लिशर्स ॲण्ड डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद.

२. प्रतिभा रानडे, स्त्री प्रश्नाची चर्चा १९ वे शतक, प्रगती प्रकाशन, पुणे.

३. डॉ. शुभांगी गोटे - गव्हाणे (२००४) महिला सबलीकरण, वरद प्रकाशन, औरंगाबाद

४. जोशी बी.आर. सुलभा तेरणीकर, जॉन्सन बोर्जेस, राऊत गणेश, डायमंड सामाजिक ज्ञानकोश खंड -१, पुणे.

५. धनागरे द.ना (२००५) संकल्पनाचे विश्व आणि सामाजिक वास्तव प्रतिमा प्रकाशन